महाराष्ट्र शासन
शिक्षण सहसंचालक, उच्च शिक्षण
१७, डॉ. आंबेडकर रोड, पुणे विभाग, पुणे ४११ ००१
Email Id – jdpunescholarship@gmail.com Website – www.jdhepune.info
फोन नं ०२०-२६१२७८३३ / २६०५१६३२
फॅक्स नं. ०२०-२६०५१६३२

जा.क्र. शिससं/उशि/पुवि/२०१९-२०/महाडीबीटी/2135

दिनांक : ०८.१०.२०२०

**अत्यंत महत्वाचे / तात्काळ**

प्रति,

१. प्राचार्य,
सर्व अशासकीय अनुदानित /विना अनुदानित
कायम विना अनुदानित वरिष्ठ महाविद्यालये,
पुणे, अहमदनगर व नाशिक जिल्हा
तसेच केंद्रशासित प्रदेश दादरा नगर हवेली.

२. कुलसचिव, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे.
३. कुलसचिव, डेक्कन महाविद्यालय व पदव्युत्तर संस्था, पुणे.
४. कुलसचिव, टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे.
५. कुलसचिव, गोखले अर्थशास्त्र व राज्यशास्त्र संस्था, पुणे.
६. कुलसचिव, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक.

**विषय : -सन २०१९-२० करीता महाडीबीटी पोर्टलवरुन विद्यार्थ्यांनी भरलेल्या शिष्यवृत्ती अर्जांची महाविद्यालय व विभाग स्तरावरुन पडताळणी करणेसाठी अंतिम मुदतवाढ देणेबाबत....**

संदर्भ : - मा. संचालनालयाचे पत्र क्र. उशिसं/शिष्य-२०१९-२०/डीबीटी/६५७६ दि. ८.१०२०२०.

उपरोक्त विषयास अनुसरुन कळविण्यात येते की, उच्च शिक्षण संचालनालयामार्फत राबविण्यात येणाऱ्या राज्य शासनाच्या विविध विभागाच्या शिष्यवृत्ती योजनांची ऑनलाईन पध्दतीने अंमलबजावणी करणेसाठी माहिती तंत्रज्ञान विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडून महाडीबीटी पोर्टल विकसित करण्यात आलेले आहे. यामध्ये उच्च शिक्षण संचालनालयामार्फत राबविण्यात येणाऱ्या १४ शिष्यवृत्ती योजनांचा समावेश आहे. विद्यार्थ्यांनी भरलेल्या शिष्यवृत्ती अर्जांची पडताळणी करणेबाबत वेळोवेळी सूचना देण्यात आलेल्या आहेत. तथापि वेळोवेळी मुदतवाढ देऊनही दि.०८.१०.२०२० रोजीच्या डीबीटी डॅशबोर्ड रिपोर्टनुसार अद्यापही एकूण ६४२ विद्यार्थ्यांचे ऑनलाईन ॲप्लिकेशन महाविद्यालयांच्या स्तरावर पडताळणीसाठी प्रलंबित असल्याचे निदर्शनास आल्यामुळे विद्यार्थी हिताच्या दृष्टीने महाविद्यालयस्तरावर प्रलंबित अर्जांची पडताळणी करणेसाठी अंतिम मुदतवाढ देणेबाबत शासनास विनंती करण्यात आलेली होती.

त्यानुसार मा. संचालनालयाच्या संदर्भिय पत्रानुसार सन २०१९-२० करीता महाडीबीटी पोर्टलवरुन ऑनलाईन पध्दतीने विद्यार्थ्यांनी भरलेल्या शिष्यवृत्ती अर्जांची महाविद्यालयाच्या स्तरावरुन पडताळणी करणेसाठी **दि.१० ऑक्टोबर, २०२० अशी अंतिम मुदतवाढ देण्यात आलेली आहे.** यापुढे कोणत्याही परिस्थितीत मुदतवाढ होणार नाही. तसेच सदरहू मुदतीनंतर प्रलंबित राहीलेले ऑनलाईन अर्ज महाडीबीटी प्रणालीतून आपोआप रद्द होणार आहेत.

महाविद्यालय व विद्यापीठ स्तरावर १४ शिष्यवृत्ती योजनांचे शिष्यवृत्तीचे अर्ज प्रलंबित आहेत त्या सर्व महाविद्यालयांनी / विद्यापीठांनी मुदतपूर्व प्रलंबित अर्ज शून्य करुन मुदतीमध्ये निकाली काढण्यात यावेत. उपरोक्त नमूद प्रमाणे प्रलंबित अर्जांची मुदतपूर्व करण्यासाठी महाडीबीटी पोर्टलवरील प्रलंबित ऑनलाईन ॲप्लिकेशनची तपासणी करुन योग्य ती कार्यवाही गांभीर्याने मुदतपूर्व करावी. तसेच दिलेल्या मुदतीनंतर महाविद्यालय / विद्यापीठ स्तरावर प्रलंबित अर्जांच्या बाबतीत, संबंधित महाविद्यालयाचे प्राचार्य / विद्यापीठाच्या बाबतीत संबंधित कुलसचिव जबाबदार राहतील. याची गांभीर्याने नोंद घ्यावी.

**(डॉ.मोहन खताळ)**
सह संचालक (उच्च शिक्षण)
पुणे विभाग, पुणे

प्रत - मा. शिक्षण संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे ४११००१ यांना माहितीस्तव सादर.